# <u>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)</u>

**सभा क्र.१४/२०२३** **दिनांक २५/०९/२०२३**
**स्थळ- जिल्हा न्यायालय, अहमदनगर** **वेळ- दुपारी ०३.०० वा.**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सी.ए. नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा सोमवार दि.२५/०९/२०२३ रोजी दुपारी ०३.०० वा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/२२९६/२०२३, दि.२३.०९.२०२३ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा सभा सोमवार दि.२५/०९/२०२३ रोजी दुपारी ०३.०० वा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे मा.श्री.सुधाकर यार्लगडडा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा. श्री. सुधाकर यार्लगड्डा,**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

**मा. श्री. सिध्दाराम सालीमठ, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

**मा. श्री. पी. शिवा शंकर, भा.प्र.से.,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

---

विषय नं.१ दि.२१.०९.२०२३ रोजी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

निर्णय क्र.५९४ दि.२१.०९.२०२३ रोजी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)

---

विषय नं.२ संस्थानचे मंदिर परिसरातील शांतीनिवास व भक्तनिवास इमारतीमधील प्रशासकीय कार्यालये साईनिवास अतिथीगृह येथील तळमजल्याचे जागेत स्थलांतरीत करणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१,८२,७१,८६०/-चे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.५९५ प्रशासकीय कार्यालय मंदिर परिसरात असल्याने कार्यालयात येणा-या नागरिकांची व भेट देणा-या व्यक्तींची मंदिर परिसरात गर्दी होत असल्यामुळे भाविकांची व व्हि.आय.पी. साईभक्तांची गैरसोय होते व त्यांना अडचण निर्माण होते. तसेच संस्थान अधिकारी व कर्मचारी यांची वाहने मंदिर परिसरात पार्किग होत असल्यामुळे भाविकांची गैरसोय होते, त्याकरीता प्रशासकीय कार्यालय मंदिर परिसराचे बाहेर असणे आवश्यक आहे, असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मत आहे.

तुर्तास आवश्यकता नाही. अल्पकालावधीसाठी १.८२ कोटी रुपये खर्च करण्याऐवजी प्रशासकीय इमारतीसाठी कायमस्वरुपी नियोजन करुन प्रस्ताव आणावा, असे मत मा.जिल्हाधिकारी महोदय तथा सदस्य, तदर्थ समिती व मा.प्रमुख जिल्हा न्यायाधीश व अध्यक्ष, तदर्थ समिती यांनी व्यक्त केले.

२:१ मताने प्रस्ताव नामंजुर.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

विषय नं.३ शिर्डी नगरपरिषद हद्दीतील एकुण ६ रस्त्यांचे भूसंपादन करणेसाठी नगरपरिषदेचे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडून अंदाजे एकुण रु.२३२.६४ कोटी रकमेचे निधी मागणी प्रस्तावाबाबत.

निर्णय क्र.५९६ माहिती घेणे आवश्यक आहे. म्हणून तहकुब.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

विषय नं.४ साईगार्डन प्रकल्पाअंतर्गत उभारणेत येणा-या लेजर शो प्रकल्पाचे ठेकेदार मे. लेजर व्हिजन लि. हॉंगकॉंग यांचे समवेत अर्बिट्रेशन करणेबाबत.

निर्णय क्र.५९७ मुदतीचा बाध आहे किंवा नाही याची माहिती घेऊन पुन्हा प्रस्ताव सादर करावा.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

विषय नं.५ नवीन श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारतीचे समोर साईभक्तांचे सुविधेकरीता व साईभक्तांचे ऊन, वारा व पाऊस यापासून संरक्षण होणेसाठी कायमस्वरुपी टेंसाईल फॅब्रीकचे छत असलेले शेड उभारणेसाठी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.५९८ प्रस्ताव मंजूर. सी.ए.दाखल करावा.

(कार्यवाही-बांधकाम विभाग/विधी विभाग)

---

विषय नं.६ संस्थानचे विविध इमारतीवरील टेरेसवर रुफ टॉप सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणीकामी ५ वर्ष कालावधीकरीता **Project Management Consultant & Transaction Advisor** नियुक्त करणेकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदांमधील एल-१ निविदाधारकाशी वाटाघाटी/ चर्चेअंती निर्णय होऊन त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.५९९ तहकुब.

(कार्यवाही-विद्युत विभाग)

---

विषय नं.७ सन २०२२-२३ या वर्षासाठी देण्यात आलेल्या एअर सर्कीट ब्रेकर्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट दि.३०/११/२०२३ अखेर संपुष्टात येत असल्याने सन २०२३-२४ या वर्षासाठी एअर सर्कीट ब्रेकर्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट देणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१६,५०,०००/-मात्रचे खर्चास तसेच सदरकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.६०० प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-विद्युत विभाग)

---

**विषय नं.८** **श्री साईबाबा संस्थान पाणी पुरवठा योजनेसाठी मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.२४५ मध्ये देणगीदारामार्फत उभारलेल्या साठवण तलावाचे मुल्यांकन करणे व त्याचा वापर सुरु करणेसाठी आवश्यक दुरुस्ती करणेबाबत.**

**निर्णय क्र.६०१** **तहकुब.**

**(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग)**

---

**विषय नं.९** **वाढीव संयुक्त पाणी पुरवठा टप्पा क्र.१ चे योजनेकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची नियुक्ती रद्द करणेबाबत तसेच सुधारीत योजना तयार करणेसाठी संकल्पन, अंदाजपत्रक तयार करणे, प्रकल्प व्यवस्थापन या सेवा घेणेसाठी तज्ञ व अनुभवी सल्लागारांकडून ई-निविदा प्रस्ताव मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६०२** **तहकुब.**

**(कार्यवाही- पाणी पुरवठा विभाग)**

---

**विषय नं.१०** **संस्थान कायम व संस्थान कंत्राटी कर्मचा-यांना गणवेश देणेबाबत. (रु.९१,९०,०००/-)**

**निर्णय क्र.६०३** **तहकुब.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.११** **विभागीय चौकशी अधिकारी यांचे नेमणुकीबाबत.**

**निर्णय क्र.६०४** **तहकुब.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१२** **नैसर्गिक शेतकरी शिबीरासाठी सशुल्क निवासव्यवस्था, श्री साई आश्रम शताब्दी मंडप व इतर सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत.**

**निर्णय क्र.६०५** **प्रस्ताव नामंजूर.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१३** दि.२० एप्रिल, २०२२ रोजीचे सुधारीत शासन निर्णयानुसार वाहतुक भत्ता (TA) मिळणेबाबत.

**निर्णय क्र.६०६** तहकुब.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

**विषय नं.१४** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०२३-२४ या वार्षिक खरेदीमधील ई-निविदेत दर प्राप्त न झालेल्या Laboratory Material करीता दर निश्चीती (Rate Contract) करणेकामीच्या फेर ई-निविदेस अनुसरुन निम्नत्तम दरधारकास पुरवठा आदेश देणेस तसेच उर्वरीत Laboratory Material करीता फेर ई-निविदा मागविणेबाबत.

**निर्णय क्र.६०७** प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.१५** सौ. सुजाता नंदकुमार जोशी, सेवानिवृत्त परिसेविका, श्री साईबाबा हॉस्पीटल यांचा एक वेतन वाढ रोखून धरलेल्या शिक्षेविरूध्द अपील अर्ज.

**निर्णय क्र.६०८** अपील एक महिन्याचे आत दाखल करणे अपेक्षित होते परंतु सदर कर्मचारी यांनी नंतर दिलेल्या प्रतिवेदनावर कार्यालयीन टिपणी दि.८/११/२०२१, ८/१२/२०२१ व २९/०३/२०२२ प्रमाणे कर्मचा-याचे बाजूने असल्यामुळे समितीपुढे न जाता प्रशासकीय स्तरावर दाद मिळण्याची शक्यता असल्याने अपिल दाखल करण्यास विलंब झाला. त्यामुळे विलंब क्षमापित करणेस पात्र आहे.

कोवीड कालावधीमध्ये एम.डी.ई. ड्रिल बॅटरी ऑपरेटेड ब्रेकडाऊन झाल्यावरही पर्यायी व्यवस्था पॉवर ड्रिल उपलब्ध असल्याने रुग्ण सेवेवर विपरीत परिणाम झालेला नाही. सदर स्पष्टीकरण स्विकारणे योग्य आहे, कारण त्याचे विरुध्द काहीही अहवाल सादर केलला नाही. म्हणून अपिल मंजूर करणे योग्य आहे.

अपिल दाखल करण्यास झालेला विलंब क्षमापित करुन अपिल मंजूर केले आहे. एक वार्षिक वेतनवाढ एक वर्षाकरीता रोखून ठेवण्याची शिक्षा रद्द करण्यात आली आहे.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.१६** **संस्थानचे दोन्ही रुग्णालयाचे मंजूर उपचार दरातील व तज्ञ डॉक्टरांना कामाच्या प्रमाणात देण्यात येणा-या प्रोत्साहन भत्त्यामध्ये सुधारणा करणेबाबत.**

**निर्णय क्र.६०९** **मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी संबधीताकडून सुचना बोलविल्या आणि त्यांची बैठक घेऊन त्यांचे म्हणणे एकुण घेतले अशी माहिती दिली. मानोसोपचार तज्ञ, त्वचारोग तज्ञ यांचेकडे येणारी किमान ओपीडी रुग्ण संख्या विचारात घेऊन त्यांचेकरीता प्रोत्साहन भत्त्यासाठी किमान ओपीडी संख्या निश्चीत करुन पुन्हा प्रस्ताव ठेवण्यात यावा. उर्वरीत प्रस्ताव मंजूर. सिव्हील अर्ज दाखल करावा.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल/विधी विभाग)**

--------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१७** **श्री साईबाबा हॉस्पीटल ESIC (Employees State Insurance Corporation) अंतर्गत Empanel करणेबाबत चा प्रस्ताव सादर करणेस निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.६१०** **प्रस्ताव मंजूर.** **(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

--------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१८** **श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरामध्ये जनऔषधीचे जेनेरीक औषध दुकान चालू करणेबाबत.**

**निर्णय क्र.६११** **प्रस्ताव मंजूर.** **(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

--------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१९** **श्री साईनाथ रक्तकेंद्राचे रक्त पिशवीचे व रक्त घटकांचे सेवा शुल्क शासन निर्णयाप्रमाणे आकारणेबाबत.**

**निर्णय क्र.६१२** **भाविकांकडून संकलीत करण्यात आलेले रक्तपिशव्या साई संस्थानचे रुग्णालयामध्ये निशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावे. तसेच संस्थान परिसरात भाविकांकडून रक्त संकलन करणा-या इतर रक्तपेढया व रुग्णालय यांनी संकलीत केलेल्या रक्त पिशव्यांना साई संस्थानचे टॅग लावून (Not for sale) रुग्णांना निशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावे व त्याचे वापराबद्दल सविस्तर माहिती दरमहा संस्थानला सादर करण्यात यावी. संस्थानचे रुग्णालयाने बाहेरुन विकत घेतले असेल आणि संस्थानचे रुग्णालयामधुन इतर रुग्णालयांना दिल्यास शासन निर्णय दि.०८/०२/२०२३ प्रमाणे शुल्क आकारण्यात यावे. शासकीय रुग्णालयांना निशुल्क व खाजगी रुग्णालयांना शासन निर्णय दि.०८/०२/२०२३ प्रमाणे शुल्क आकारण्यात यावे. धोरणात्मक बाब असल्याने सी.ए. दाखल करण्यात यावा.** **(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय/विधी विभाग)**

--------------------------------------------------------------------------------

विषय नं.२० मौजे शिर्डी, ता.राहाता येथील महाराष्ट्र शासन यांची सिटी सर्व्हे नं.९३ पै. क्षेत्र ९३.७ चौ.मिटर इतकी जागा ही श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना साईभक्तांचे सुविधेसाठी चप्पल स्टॅण्ड, लाडू काऊंटर व साईभक्तांना बसणेकामी सदर जागेवर बांधकाम करणेसाठी परवानगी मिळणेबाबत.

निर्णय क्र.६१३ तहकुब.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

विषय नं.२१ श्री साईबाबा संस्थानच्या मुंबईस्थीत साईनिकेतन या इमारतीतील राहत असलेल्या भाडेकरु यांची भाडेवाढ करणेबाबत.

निर्णय क्र.६१४ तहकुब.

(कार्यवाही- मालमत्ता विभाग)

---

विषय नं.२२ संस्थानचे मंदिर परिसर गेट नं. ४ लगत मोबाईल कॅमेरा क्लोकरूम चालविण्यास परवानगी मिळणेबाबत.

निर्णय क्र.६१५ तहकुब.

(कार्यवाही- मालमत्ता विभाग)

---

विषय नं.२३ मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचेकडील भुसंपादन निवाडा एलएक्यु/एसआर/१०/२०००, दि.१३.०८.२०१५ अन्वयेच्या निवाडयाप्रमाणे क्षेत्र ४.७३.१९ हेक्टर (४७३१९ चौमी) चा ताबा संस्थानला मिळणेबाबत.

निर्णय क्र.६१६ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही- मालमत्ता विभाग)

---

विषय नं.२४ श्री साईबाबा नवीन दर्शन कॉम्पलेक्स मधील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग व गार्डनिंगची कामे आऊटसोर्स पध्दतीने करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेबाबत.

निर्णय क्र.६१७ प्रस्ताव मंजूर. सी.ए. दाखल करण्यात यावा.

(कार्यवाही-आरोग्य विभाग/विधी विभाग)

---

**विषय नं.२५** **श्री साई प्रसादालय येथील जुनी सोलर स्टीम कुकींग यंत्रणा बायबॅक करुन नवीन अत्याधुनिक सोलर स्टीम कुकींग यंत्रणा उभारणी करणेस मान्यता मिळणेबाबत. (४.५ कोटी)**

**निर्णय क्र.६१८** **प्रस्ताव मंजूर. सी.ए. दाखल करण्यात यावा.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग/विधी विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२६** **संस्थानचे सर्व निवासस्थानामध्ये खोली देतेवेळी साईभक्तांकडून अनामत (डिपॉझिट) रक्कम घेणेबाबत.**

**निर्णय क्र.६१९** **तहकुब.** **(कार्यवाही-श्री साईबाबा भक्तनिवासस्थान)**

-----------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२७** **शिर्डी शहरातुन जाणा-या अहमदनगर-कोपरगाव (NH-160) या राष्ट्रीय महामार्गावर साईभक्तांसाठी साईआश्रम, साईबाबा भक्तनिवासस्थान, शिर्डी बसस्थानक, नवीन दर्शनरांग इमारत ते श्री साई प्रसादालय या ठिकाणी स्कायवॉक उभारणेकामी सल्लागार नेमणूकीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन RPF (Request For Proposed) मागविणेबाबत.**

**निर्णय क्र.६२०** **तहकुब.** **(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२८** **श्री साईबाबा संस्थानमार्फत नव्याने लेजन शो (Light & Sound Show) प्रकल्प BOT (Build-Operate-Transfer) तत्वावर उभारणेसाठी सल्लागार नेमणूकीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन RPF (Request For Proposed) मागविणेबाबत.**

**निर्णय क्र.६२१** **तहकुब.** **(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२९** **नवीन श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारतीमध्ये श्री साईबाबांचे जीवन चरित्रावर आधारीत विविध प्रसंग तसेच बाबांच्या विविध मुद्रा कॅनव्हास वर चित्रीत करणे व लावणेसाठी मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६२२** **तहकुब.** **(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------

विषय नं.३० श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारतीकरीता आकर्षक विद्युत रोषणाई करणे तसेच एलईडी प्रोजेक्शन श्री साईबाबांचे जीवन चरित्रावरील थीम, व्हिडीओ इफेक्ट, होलोग्राफीक इमेज इ. तयार करणेसाठी सल्लागार नियुक्ती करणेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावामधील निम्नतम दरधारक **Rhino Engineers Pvt. Ltd., Ahmedabad** यांचे दर स्विकारणेबाबत.

निर्णय क्र.६२३ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

विषय नं.३१ श्री साई प्रसादालय व लाडू किचन नुतनीकरण करीता तांत्रिक सल्लागार नेमणूक करणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.६२४ तुर्तास गरज नाही. (कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)

---

विषय नं.३२ श्री पुण्यतिथी उत्सव-२०२३ किर्तनकार ठरविणे व मानधन निश्चीत करणे.

निर्णय क्र.६२५ श्री पुण्यतिथी उत्सव-२०२३ मध्ये ह.भ.प्र.प्रभंजन भगत, लोणी, ता. राहाता या किर्तनकाराची निवड करण्यात येऊन त्यांना रु.२०,०००/- मानधन देण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.३३ श्री पुण्यतिथी उत्सव -२०२३ मध्ये आयोजित करावयाच्या सांस्कृतीक कार्यक्रमासाठी कलाकार व मानधन निश्चीत करणे.

निर्णय क्र.६२६ श्री पुण्यतिथी उत्सव -२०२३ मध्ये आयोजित करावयाच्या सांस्कृतीक कार्यक्रमासाठी प्रस्तावामधील नमुद विनामुल्य सेवा देणा-या अ.नं.३,५,६ व १० मध्ये नमुद कलाकांराची निवड करण्यात आली. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.३४ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता वार्षिक सन २०२३-२४ करीता कार्यालयीन छपाई करणेकामीच्या पात्र ऑनलाईन कमर्शिअल ई-निविदेतील निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देणेस तसेच उर्वरीत छपाई खरेदीकामी तातडीने कोटेशन मागविणे बाबत.

निर्णय क्र.६२७ तहकुब. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.३५ श्री साईबाबा संस्थानचे दोन्ही हॉस्पिटलकरीता नवीन Tablet खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजीत खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६२८ तहकुब. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३६ कॅन्टीन विभागाकरीता सन २०२३-२४ साठी बिस्कीटे खरेदीकामी ई-निविदा प्राप्त निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.६२९ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**विषय नं.३७ संस्थानचे लाडू निर्मिती, मंदिर व प्रसादालय विभागांसाठी गाईचे शुध्द तुप खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकास मे.स्प्रिती प्रॉडक्ट प्रा.लि. अंबाला यांचे प्लॅटचे व्हेंडर ऑडिटसाठी संस्थानची टिम निश्चित होणेस व पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.६३० व्हेंडर ऑडिटसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी टिम निश्चीत करावी. प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**विषय नं.३८ सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या कालावधीसाठी व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता कामे आऊटसोर्स पध्दतीने निम्नतम दरधारकाकडून करुन घेणेकामी निम्नतम दरधारकास मा.तदर्थ समिती सभेसमोर चर्चा वाटाघाटी करुन कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६३१ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-व्दारावती भक्तनिवासस्थान)**

---

**विषय नं.३९** सन २०२३-२४ व सन २०२४-२५ मधील (दि.०१.१०.२०२३ ते दि.३१.०३.२०२५) या कालावधीसाठी साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लबींग, स्वच्छता इत्यादी दुरुस्ती व देखभालीची कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी निम्नतम दरधारकास चर्चा वाटाघाटी करुन कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.६३२** प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-साई आश्रम भक्तनिवासस्थान)

---

**विषय नं.४०** साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लबींग, स्वच्छता इत्यादी दुरुस्ती व देखभालीची कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेबाबत.

**निर्णय क्र.६३३** प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-साई धर्मशाळा)

---

यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१** सन २०२३-२४ या वर्षाकरीता एलआयसी ग्रुप ग्रॅच्युईटी इन्शुरन्स स्कीम नुतनीकरणाबाबत.

**निर्णय क्र.६३४** प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-लेखाशाखा)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकडील आवश्यक नर्सिंग व पॅरामेडीकल कर्मचारी यांचे रिक्त पदे लेबर ठेकेदारामार्फत भरणेबाबत.

**निर्णय क्र.६३५** प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३** **सन २०२३-२४ करीता श्री साई प्रसादालयात चपाती मशिनवर मनुष्यबळ पुरवुन चपाती बनविणे कामाची मागविण्यात आलेल्या ई-निविदेतील प्राप्त दराबाबत.**

**निर्णय क्र.६३६** **प्रस्तावात नमुद अ.नं.२ नुसार कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साई प्रसादालय)**

---

**वरील निर्णय क्र. ५९४ ते ६३६ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर सायं. ०७.३० वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-
**(पी.शिवा शंकर,भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(सिध्दाराम सालीमठ,भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(सुधाकर यार्लगड्डा)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**